# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१५११/२२/त.क्र.१४३ /२५/०१

श्री. मोगुलप्पा हनुमंता जोगु
शांतीनगर, रुम नं.११, श्री ओम शाही कॉलनी,
शिवसेना ऑफिसच्या बाजुला, उल्हासनगर-३, जि.ठाणे.

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (घ. क.व्य) डी विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त डी विभाग कार्यालय,
महापालिका कार्यालय इमार, दुसरा मजला, जोबनपुत्र कंपाऊंड,
नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई-४००००७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता डी विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त डी विभाग कार्यालय,
महापालिका कार्यालय इमार, दुसरा मजला, जोबनपुत्र कंपाऊंड,
नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई-४००००७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.१२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित (तत्कालिन) |

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्री.मोगुलप्पा हनुमंता जोगू यांनी दिनांक १५/०२/२०२२ रोजी पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित कलम १८ अन्वये प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केलेला असून तक्रारदार यांचा मुख्य आक्षेप हा त्यांचे वडील श्री.हनुमंता तमाय्या हे घनकचरा व्यवस्थापन डी विभाग येथे सफाई कामगार म्हणून कार्यरत होते व त्यांचा दिनांक २९ एप्रिल, १९८३ रोजी मृत्यू झाला त्यावेळी त्यांची आई श्रीमती कमला हनुमंता यांनी पीटी केस अर्ज दिला होता.

दिनांक ५ जुलै, १९८३ मध्ये दिलेला पीटी केस नोकरी, ग्रॅज्युएटी उपदानाचा दावा आणि कुटुंब निवृत्ती वेतन अद्याप पर्यंत दिले नसल्याचे नमूद करीत तसेच त्यांचे सेवा पुस्तक, सेवेचा तपशील सापडत नसल्याने यावर माहिती अधिकार अर्ज दाखल केला होता व त्यावर तत्कालीन माननीय आयुक्त यांनी दिनांक १५/०२/२०२२ रोजी पारित आदेशात अपीलार्थीच्या पीटी केस प्रकरणाबाबत अद्ययावत स्थिती उपलब्ध कागदपत्रांसह सात दिवसात प्रदान करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती प्रतिमा घाडी यांनी त्यांचा सविस्तर असा लेखी युक्तिवाद, अपीलार्थिनी दाखल केलेल्या सर्व अर्जांसह तसेच त्यांना या आधी दिलेल्या प्रतिसादासह सादर केलेला आहे. यात अपिलार्थींना दिनांक २२/०६/२०२४ रोजी श्री.हनुमंता तमाय्या

जोगू व कमला हनुमंता जोगू यांची नोंद आढळून आली नसल्याचे सुचित केलेले पत्र देखील असून यात अपिलार्थींना द्वितीय अपील आदेश पारित केल्यानंतर माहिती उपलब्ध नसल्याबाबत प्रतिसाद दिलेला आहे. तसेच या संदर्भात घनकचरा व्यवस्थापन, डी विभाग येथील माहिती शोधण्याबाबत केलेले प्रयत्न व त्या अनुषंगाने इतर सर्व कागदपत्रांचा संच देखील सादर केलेला आहे.

श्री.जोगू यांचा प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज व तक्रार अर्जात त्यांची आग्रही भूमिका ही श्री.जोगू यांना पी टी केस मध्ये नोकरी लागण्याबाबत असून प्रस्तुत बाब ही त्यासाठी त्यांना त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचा सेवा अभिलेख इत्यादी बाबतीतील हव्या असणाऱ्या संदर्भात आहे.

या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या वैयक्तिक कार्यकक्षेत तत्कालीन द्वितीय अपील अर्जावर पारित केलेला आदेश व त्या अनुषंगाने त्याची झालेली अंमलबजावणी, अनुपालन लक्षात घेता यात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडून आदेशाचा अवमान झाला असल्याची अथवा त्याचे अनुपालन झाले नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येत नाही.

तक्रारदार श्री.जोगू यांनी त्यांचे वडील श्री.हनुमंता तमाय्या व आई श्रीमती कमला हनुमंता यांच्या जागी नोकरी मिळण्याबाबत ते करीत असलेल्या प्रयत्नांमध्ये माहिती अधिकारातील तक्रार अर्ज हा मार्ग निश्चितच नाही. तक्रारदार यांनी योग्य त्या प्रशासकीय प्राधिकरणाकडे याबाबत त्यांना कायद्याद्वारे दिलेल्या अधिकारांन्वये प्रयत्न करण्याच्या सूचनेसह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांनी केलेल्या दिनांक १०/०१/२०२५ रोजीच्या निवेदनाची एक प्रत त्यांनी आज सुनावणी दरम्यान अवलोकनार्थ सादर केली. उपरोक्त निवेदनावर माननीय मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १८/०१/२०१३ रोजी पारित केलेल्या शासन निर्णयानुसार विहित मुदतीत योग्य ती प्रक्रिया करण्याच्या सूचनेसह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१२.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission ★ Maharashtra ★